# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६२१२२८
२५६२१२२९
ई—मेलः pldvp@unipune.ac.in

नियोजन व विकास विभाग,
गणेशखिंड, पुणे—४११००७.

संदर्भ : साफुपुवि/निवि/४३६ दिनांक : ०३/११/२०२५

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था आणि
मा. विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक विभाग/प्रशाळा/केंद्र

**विषय** :— विद्यापीठ वर्धापनदिन पुरस्कार सन २०२५—२६ अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

**संदर्भ** :— या विभागाचे पत्र क्र. साफुपुवि/निवि/४१०, दिनांक : २७/०९/२०२५

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये शैक्षणिक गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५—२६ करिता विद्यापीठ वर्धापनदिनी देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट विद्यापीठ शैक्षणिक विभाग, उत्कृष्ट महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, उत्कृष्ट प्राचार्य/संचालक पुरस्कार, उत्कृष्ट अध्यापक पुरस्कार (महाविद्यालये/परिसंस्था), तसेच राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार प्राप्त अध्यापकांचा सन्मान (felicitation) (महाविद्यालये/परिसंस्था व विद्यापीठ विभाग), उत्कृष्ट नाविन्यपूर्ण अध्यापन पुरस्कार, नाविन्यपूर्ण विशेष उपक्रम/संशोधन पुरस्कार, उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार, उत्कृष्ट संचालक, शारीरिक शिक्षण व क्रीडा पुरस्कार या पुरस्कारांसाठी संदर्भिय पत्रासोबत जोडलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले असुन सदर अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याचा कालावधी **सोमवार दिनांक २९ सप्टेंबर, २०२५ ते मंगळवार दिनांक २८ ऑक्टोबर, २०२५** असा निश्चित करण्यात आला होता.

या पत्रान्वये सदर अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यास **शुक्रवार दिनांक ०७ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे.**

विद्यापीठ संकेतस्थळावरून सदर अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची लिंक पुढीलप्रमाणे—

**www.unipune.ac.in → Home page BOD Online → Login → Login & password → Planning and Development**

ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जाची छापील प्रत आवश्यक सर्व कागदपत्रांसह **शनिवार, दिनांक ०८ नोव्हेंबर, २०२५** पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये नियोजन व विकास विभागामध्ये सादर करावीत.

आपणांस विनंती की, सदर पत्र आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेमधील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे. ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जाची छापील प्रत विहीत मुदतीत सादर न केल्यास तसेच ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त इतर पध्दतीने सादर केलेल्या अर्जांचा पुरस्कारासाठी विचार केला जाणार नाही. **तसेच या कालावधीनंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही** याची कृपया नोंद घ्यावी. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास collegesupport@pun.unipune.ac.in या ईमेलवर अथवा ०२०—७१५३३६३३/४८५५४०९० या क्रमांकावर संपर्क साधावा.

आपली विश्वासू,

03/11/25

डॉ. वैशाली साकोरे
उपकुलसचिव (अतिरिक्त कार्यभार)